30 NOV 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### कुलगुरु देवानंद शिंदे यांच्या ग्रंथसंग्रहाची पाहणी; सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन

# शिवाजी विद्यापीठाकडून 'भिलार'ला ५१७ ग्रंथांची अनोखी भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : देशातील वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी 'भिलार'सारखी पुस्तकांची गावे जिल्ह्या-जिल्ह्यांत निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी भिलार (जि. सातारा) येथे व्यक्त केली.

सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी यांची ९८वी जयंती अशा संयुक्त कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. या कार्यक्रमात विद्यापीठातर्फे 'भिलार'ला ५१७ पुस्तके प्रदान करण्यात आली. कुलगुरु डॉ. शिंदे यांनी काल सकाळपासूनच 'भिलार'मध्ये फिरुन तेथील विविध घरांमधील ग्रंथसंग्रहाची पाहणी केली. प्रकल्प समन्वयक श्री. धर्माधिकाऱ्यांनी त्यांना या प्रकल्पाविषयी माहिती दिली. त्यावर कुलगुरु डॉ. शिंदे यांनी वाचनसंस्कृती जोपासण्यासह ती वृद्धिंगत करण्यासाठी भिलार येथे राबविलेला पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरुपाचा असल्याचे मत व्यक्त केले. राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी 'भिलार'च्यावतीने कुलगुरु डॉ. शिंदे हस्ते ग्रंथभेट स्वीकारली. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. ता. भोसले, उद्योजक सारंग पाटील, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, आर. एस. पाटील, दिलीप कुरळपकर, बी. एस. सावंत आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांच्याकडे 'भिलार'साठी ५१७ ग्रंथांची भेट देण्यात आली. यावेळी शेजारी व्ही. एन. शिंदे, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, विलास नांदवडेकर, डी. आर. मोरे, आदी उपस्थित होते.

### नागरबाई शिंदे यांचा गौरव

स्वत: अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला मोठ्या संघर्षातून जिद्दीने शिकवून कुलगुरु पदापर्यंत पोहोचविणाऱ्या नागरबाई शिंदे यांना या कार्यक्रमात गौरविण्यात आले. त्यांना संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते मातृ-पितृ पुरस्कार प्रदान करण्यात आला.


30 NOV 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे 'पुस्तकांच्या गावा'ला ५१७ ग्रंथभेट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
देशातील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने भिलारसारखी पुस्तकांची गावे जिल्ह्या जिल्ह्यात निर्माण व्हायला हवीत, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भिलार (जि. सातारा) येथे व्यक्त केली.

देशातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या भिलारला शिवाजी विद्यापीठातर्फे ५१७ पुस्तके प्रदान करण्यात आली. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे ४५ वे अधिवेशन, मातृ-पितृ पुरस्कार वितरण आणि स्वातंत्र्यसैनिक देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी यांची ९८ वी जयंती अशा संयुक्त समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. कार्यक्रमात विद्यापीठाच्या वतीने हा पुस्तक प्रदान सोहळा पार पडला.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी भिलार गावात फिरून तेथील विविध घरांमधील ग्रंथसंग्रहाची पाहणी केली. प्रकल्प समन्वयक धर्माधिकारी यांनी त्यांना या समग्र प्रकल्पाविषयी माहिती दिली.



**कोल्हापूर : भिलार येथील पुस्तकांची पाहणी करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

सध्या या प्रकल्पांतर्गत भिलारमध्ये सुमारे १५ हजार पुस्तके असून अनेक घरे वाचकांच्या स्वागतासाठी रात्रंदिवस खुली असतात, अशी माहिती त्यांनी दिली. यावर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी वाचन संस्कृती जोपासण्यासाठी व वृद्धिंगत करण्यासाठी भिलार येथे राबविलेला पुस्तकांचे गाव हा प्रकल्प स्तुत्य व ऐतिहासिक स्वरूपाचा असून, त्यासाठी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचा उत्साह अवर्णनीय आहे. विद्यापीठातर्फे सध्या प्रातिनिधिक स्वरूपात ५१७ पुस्तकांची देणगी देत आहोत. या पुढील काळातही या उपक्रमामध्ये विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करीत राहील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिली. विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या पुस्तकांबरोबरच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्राचार्य यांनीही काही पुस्तके भेट स्वरूपात दिली.

महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी भिलारच्या वतीने कुलगुरूंच्या हस्ते ग्रंथभेट स्वीकारले.

## नागरबाई शिंदे यांचा मातृ-पितृ पुरस्काराने गौरव

स्वतः अल्पशिक्षित असूनही आपल्या मुलाला मोठ्या संघर्षातून जिद्दीने शिकवून कुलगुरूपदापर्यंत पोहोचविणाऱ्या नागरबाई शिंदे यांचा या कार्यक्रमात संभाजीराव पाटणे यांच्या हस्ते मातृ-पितृ पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. आपल्या आईचा गौरव केल्याबद्दल डॉ. शिंदे यांनी आयोजकांना मनापासून धन्यवाद दिले.

यावेळी उद्योजक सारंग श्रीनिवास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. ता. भोसले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संभाजीराव पाटणे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, डी. आर. मोरे, आर. एस. पाटील, दिलीप कुरळपकर, बी. एस. सावंत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
30 NOV 2017
Times of India

# SUK donates over 500 books to Bhilar village

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has donated 517 books to Bhilar village, also known as book village, around 177km from Kolhapur, earlier this week.

Devanand Shinde, vice-chancellor, SUK, who was present for an event at the village donated the books.

He congratulated the villagers for the successful operation of the books and said that this unique initiative has set up a new dimension. He added that the university will continue to donate more and more books periodically.

Intrestingly, the book village project was undertaken by the Marathi Bhasha department wherein 25 locations around the village have been turned into reader hotspots. Seventy five artists have creatively designed the 25 locations at the village.

The state has provided several facilities such as chairs, tables, decorated umbrellas and glass cupboards with the local villagers to enhance the reading experience of literary connoisseurs visiting there.

According to the university officials, the village has around 15,000 books to be kept there permanently for the public at around 25 key locations around the village of 600 families.

30 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाचा समावेश अभ्यासक्रमात करावा

## संविधान दिनानिमित्त विद्यापीठातर्फे आयोजित परिसंवादात प्रमुख वक्त्यांचा सूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय संविधानाविषयी नागरिकांत जास्तीत जास्त जागृती करण्याची गरज असून संविधानाचा नियमित अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या परिसंवादातील व्यक्त्यांचा होता.

भारतीय संविधान दिनानिमित्त विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादात डॉ. रविनंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि डॉ. राजेंद्र कुंभार (सातारा) यांनी सहभाग नोंदवला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

**क्रांतीचे चक्र पूर्ण फिरविणे आवश्यक: डॉ. कुंभार**

डॉ. राजेंद्र कुंभार म्हणाले, 'एक मत, एक मूल्य' हा प्रवास पूर्ण करून क्रांतीच्या चक्रास पूर्णत्व प्रदान करावयाचे आहे. माहीतगार आणि नीतिमान लोकांचा समूहच देशाला खऱ्या लोकशाहीपर्यंत घेऊन जातील. सामाजिक समता ही आपोआप प्रस्थापित होणारी बाब नसून त्यासाठी शिक्षणाची पुनर्मांडणी करण्याची गरज आहे. त्यासाठी संविधानाचा अभ्यासात समावेश होणे आवश्यक आहे. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य व समता प्राप्त करण्यासाठी संघर्ष अटळ आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डावीकडून डॉ. एस.एस. महाजन, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. सुभाष दगडे व डॉ. रविनंद होवाळ.**

**राष्ट्रीय वृत्ती अंगी बाणवा: डॉ. होवाळ**

डॉ. रविनंद होवाळ म्हणाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या ७० वर्षांच्या वाटचालीत आपण आता कुठे संविधानाच्या प्रास्ताविकेपर्यंत पोहोचलो आहोत. डॉ. आंबेडकर यांनी संविधानात प्रत्येक शब्द अत्यंत अभ्यासपूर्वक व चिकित्सकपणे योजला आहे. घटना राबविणारे हात चांगले असतील, तर तिची चांगली फळे मिळतील, अन्यथा हे चांगले हात निर्माण करण्याची जबाबदारी समाजाची आहे, याची जाणीव बाबासाहेबांनी करून दिलेली होती.

### शिक्षणव्यवस्था विज्ञानवादी व्हावी : प्रा. दगडे

प्रा. सुभाष दगडे म्हणाले, बाबासाहेबांनी भारतातील विषमतावादी समाजरचनेचा सर्वंकष अभ्यास करून सामाजिक, नैसर्गिक मूल्यांवर आधारित संविधान दिले. पूर्वापार वसलेल्या धर्मसंसदेपेक्षा लोकसंसद प्रभावी ठरली पाहिजे, लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे, असा आग्रह होता. या पार्श्वभूमीवर बुद्धीप्रामाण्यवादी, लोकशाहीवादी दृष्टीकोन निर्माण करण्याची जबाबदारी धोरणकर्त्यांवर आहे. आजची शिक्षणव्यवस्था अधिकाधिक विज्ञानवादी होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने संविधान दूत ही योजना आजपासून अंमलात आणली आहे. विद्यापीठ स्तरावर संविधान दूतांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात येईल. संविधान जागृतीसाठी करावयाच्या उपक्रमांचे धोरण आखून आखण्यात येणार आहे.

विधी सेवा प्राधिकरणाचा ब्रँड अँम्बॅसिडर असलेल्या पाच वर्षांच्या रेहान शकील नदाफ या बालकाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. एस.एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तेजपाल मोरे यांनी आभार मानले.

30 NOV 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची 'सुवर्ण' कामगिरी

## आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा; खेळाडूंनी पटकविली १३ पदके

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करीत दापोलीतील राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत चार सुवर्णपदकांसह एकूण १३ पदके पटकविली आहेत.

यामध्ये प्रगती संकपाळ हिने तिहेरी उडी प्रकारात, शीतल पिंजारे हिने उंच उडी प्रकारात, चैत्राली गुजर हिने १०० मीटर धावणेमध्ये, तर निशिगंधा मोरे हिने डिस्क्स थ्रो प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. अन्य क्रीडाप्रकारांमध्ये कीर्तिकुमार बेनके (गोळाफेक, कांस्यपदक), रामदास पाटील (१५०० मीटर धावणे, कांस्यपदक. ८०० मीटर धावणे, रौप्यपदक), चैत्राली गुजर (२०० मीटर धावणे, रौप्यपदक), हृषिकेश काटे (उंचउडी, कांस्य), निशिगंधा मोरे (थ्रो, कांस्य), विजय जाधव (१०० मीटर धावणे, कांस्य) यांनी यश मिळविले. ४ बाय १०० मीटर रिले टीम प्रकारात मुलांच्या संघाने, तर ४ बाय १०० मीटर रिले टीम प्रकारात मुलींच्या संघाने रौप्यपदक पटकाविले आहे. दरम्यान, ही स्पर्धा उद्या, शुक्रवारपर्यंत होणार आहे. यामध्ये विद्यापीठाचा १२० खेळाडूंचा संघ सहभागी झाला आहे.



दापोली येथे सुरू असलेल्या आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धेतील एक क्षण.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 NOV 2017
तरुण भारत



**कोल्हापूर : दापोली येथे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात संचलन करताना शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

# दापोली येथील क्रीडामहोत्सवात शिवाजी विद्यापीठाला १३ पदके

प्रतिनिधी
कोल्हापूर

दापोली येथील क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने चार सुवर्णपदकांसह एकूण १३ पदके प्राप्त केली.

प्रगती संकपाळ हिने तिहेरी उडी क्रिडा प्रकारात सुवर्णपदक पटकावले. किर्तीकुमार बेनाके हिने गोळाफेकमध्ये व रामदास पाटील याने दीडशे मीटर धावने प्रकारात रौप्यपदक मिळवले आहे. चित्राली गुजर याने शंभर मीटर धावणे प्रकारात सुवर्ण पदक पटकावले आहे. ऋषीकेश काटे हिने उंच उडी प्रकारात रौप्यपदक मिळवले आहे. निशिगंधा मोरे हिने भालाफेक प्रकारात रौप्यपदक मिळवले आहे. विजय जाधव हिने शंभर मीटर धावने प्रकारात रौप्यपदक पटकावले आहे. निशिगंधा मोरे हिने थाळीफेक प्रकारात सुवर्णपदक पटकावले आहे. शीतल पिंजारे हिने उंच उडी प्रकारात सुवर्णपदक पटकावले आहे. रामदास पाटील हिने आठशे मिटर धावणे प्रकारात कांस्यपदक मिळवले आहे. चित्राली गुजर हिने दोनशे मिटर धावणे प्रकारात कास्यपदक मिळवले आहे. तर ४ बाय १०० मिटर रिले प्रकारात विद्यापीठाच्या पुरूष आणि महिला संघाने रौप्य पदक पटकावले.

क्री

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2017
पुढारी

# क्रीडा महोत्सवांतर्गत विद्यापीठास तेरा पदके

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दापोली येथे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बुधवारअखेर चार सुवर्णपदकांसह एकूण १३ पदके प्राप्त केली आहेत. दापोली येथे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ येथे २७ नोव्हेंबरपासून क्रीडा महोत्सव सुरू आहे. महोत्सव १ डिसेंबरपर्यंत असणार आहे.

**पदक मिळालेले प्रकार आणि नावे :**

प्रगती रामचंद्र संकपाळ (सुवर्णपदक, तिहेरी उडी), कीर्तीकुमार जयप्रकाश बेनकर (कांस्य, गोळाफेक), रामदास तानाजी पाटील (रौप्य ८०० मी. धावणे व कास्य, १५०० मीटर धावणे), चैत्राली कालीदास गुजर (सुवर्ण, १०० मी. धावणे व रौप्य २०० मी. धावणे), ऋषीकेश धोंडिराम काटे (कांस्य, उंच उडी), निशिगंधा चंद्रकांत मोरे (सुवर्ण थाळीफेक व कांस्य, भालाफेक), विजय लक्ष्मण जाधव (कांस्य, १०० मी. धावणे), शीतल पिंजारे (सुवर्ण, उंचउडी), पुरुष गट (रौप्य, रिले), महिला गट (रौप्य, रिले) आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठ संघाला ४ सुवर्ण

**कोल्हापूर :** दापोली येथे सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बुधवारअखेर चार सुवर्णपदकांसह एकूण १३ पदके मिळवली. प्रगती संकपाळ (तिहेरी उडी), कीर्तीकुमार बेनके (गोळाफेक), रामदास पाटील (धावणे), चैत्राली गुजर (धावणे), हृषीकेश काटे (उंच उडी), निशिगंधा मोरे (भाला फेक), विजय जाधव (धावणे), निशिगंधा मोरे (थाळी फेक), शीतल पिंजारे (उंच उडी) अशी वैयक्तिक पदक विजेत्यांची नावे आहेत. त्याचबरोबर कोल्हापूरने पुरुष आणि महिलांच्या सांघिक सामन्यातही पदक मिळवले.

30 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑलिम्पिक 'ॲथलेटिक्स' टॅलेंट हंटचे आयोजन


## नॅशनल युवा सोसायटी-गेल इंडियन स्पोर्टस् स्टार यांच्या वतीने निवड चाचणीचे आयोजन

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

२०२० मध्ये टोकिओ (जपान) येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या दृष्टीने देशभरातील प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्याच्या उद्देशाने आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या दृष्टीने तयार करण्याच्या उद्देशाने ॲथलेटिक्समधील रनिंग (धावणे) या खेळ प्रकारासाठी टॅलेंट हंटचे आयोजन करण्यात आले आहे. नॅशनल युवा सोसायटी (एन.वाय.सी.एस.) व गेल इंडियन स्पोर्टस् स्टार यांच्या वतीने ही निवड चाचणी होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर शनिवारी (दि. २ डिसेंबर) सकाळी ९ वाजता, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या निवड चाचणीचे उद्घाटन होणार आहे. कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी असणाऱ्या या निवड चाचणीत खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन 'एनवायसीएस'चे राज्य समन्वयक मंगेश बेंडखळे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी जिल्हा समन्वयक दीपक शिरगावकर, विकास पाटील आदी उपस्थित होते.

यंदा या उपक्रमाचे तिसरे वर्ष असून देशातील ११० जिल्ह्यांत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ११ ते १७ वयोगटांतील मुला-मुलींतून १००, २०० व ४०० मीटर धावणे प्रकारासाठी निवड चाचणी होणार आहे. जिल्हास्तरावरून निवडलेल्या मुला-मुलींची निवड बालेवाडी (पुणे) येथे होणाऱ्या राज्य निवड चाचणीसाठी होणार आहे. तेथे दोन दिवसांच्या शिबिरासह निवड चाचणी होईल. यातून निवडलेले खेळाडू दिल्ली येथे होणाऱ्या अंतिम राष्ट्रीय चाचणीसाठी पात्र ठरतील. येथे आठ दिवसांच्या शिबिरासह निवड चाचणी होणार आहे. यातून अंतिम ८ ते १० खेळाडूंची निवड केली जाणार आहे. या निवडलेल्या खेळाडूंना २०२० च्या ऑलिम्पिकसाठी तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी संयोजकांची असणार आहे. प्रशिक्षकांसाठी मानधन, क्रीडा साहित्य, पोषक आहार, विविध स्पर्धांसाठी होणारा प्रवास खर्च यासह विविध प्रकारच्या सोयी-सुविधा खेळाडूंना उपलब्ध होणार आहेत.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्याची संधी त्यांना मिळणार आहे. अधिकाधिक स्पर्धकांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी पुढील वेबसाईटशी संपर्क साधावा www.nycsindia / www.gailindiaspeedstar.org .



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2017
लोकमत


# वासवानी यांची 'डोळस' कामगिरी

लहानपणापासून दिव्यांग (अंध) असणारे डॉ. मनोहर वासवानी हे शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागात सहायक प्राध्यापकपदी कार्यरत आहेत. ब्रेललिपी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ते गेल्या दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणाचे धडे देत आहेत. दिव्यांग असूनही त्यांची शिक्षण क्षेत्रातील 'डोळस' कामगिरी प्रेरणादायी आहे.

डॉ. वासवानी हे मूळचे नागपूरचे. लहानपणापासून असलेल्या अंधत्वावर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एप्रिल २००८ मध्ये

**संतोष मिठारी**

शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागात रिक्त असलेल्या सहायक प्राध्यापक पदाच्या भरतीची प्रक्रिया सुरु झाली. यासाठी डॉ. वासवानी यांनी अर्ज केला. अन्य उमेदवारांप्रमाणे त्यांनी मुलाखत, आदी प्रक्रिया केली. त्यातून त्यांची या विभागात नियुक्ती झाली. इंग्रजी विषयातील एम. ए., एम. फिल. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ते अध्यापन करतात. त्यासाठी ते ब्रेललिपी आणि ग्रंथालयातील पुस्तके स्कॅन करून ती लॅपटॉपवर घेऊन वाचन करतात. लेक्चर आणि चर्चा याद्वारे ते अध्यापन करतात. गेल्या दहा वर्षांपासून ते सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यासह विद्यापीठातील करिअर गाइडन्स् अ‍ॅण्ड कौन्सिलिंग फॉर स्टुडंटस् सेल, यूथ पार्लमेंट स्पर्धा समितीच्या सदस्यपदी त्यांनी काम केले आहे. अंध विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचे नियम तयार करण्याची समिती, ग्रंथालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या अभ्यास केंद्राच्या उपक्रमांमध्ये ते कार्यरत आहेत. अध्यापन क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन 'नॅशनल फेडेरशन ऑफ द ब्लाईंड'च्या महाराष्ट्र शाखेने डॉ. वासवानी यांना 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित केले आहे.



शिक्षण, जिद्द आणि कष्टाच्या जोरावर मी सहायक प्राध्यापकपदापर्यंत पोहोचलो आहे. मी स्वत: ला कमी लेखत नसून, इतरांच्या बरोबरीने काम करतो. विद्यापीठ आणि इंग्रजी विभागातील माझे सहकारी, विद्यार्थ्यांचे मला नेहमीच सहकार्य राहिले आहे. माझ्या अध्यापनावर विद्यार्थी समाधानी आहेत.

\- डॉ. मनोहर वासवानी